# मराठी (प्रथम भाषा) : इ. ७ वी

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे–३०.**

**'STARS' प्रकल्पांतर्गत**

## संकलित मूल्यमापन १ : २०२४–२५

**इयत्ता – सातवी : विषय – मराठी (प्रथम भाषा)**

---

**विद्यार्थ्याचे नाव :** ____________________ **हजेरी क्रमांक :** ______

**शाळेचे नाव :** ____________________ **तुकडी :** ______

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **दिनांक :** / /२०२४

**अध्ययन निष्पत्तीनिहाय व प्रश्ननिहाय गुणनोंदणी तक्ता**

| अध्ययन निष्पत्ती क्रमांक | 07.01.03 | 07.01.04 | 07.01.18 | 07.01.01 | 07.01.02 | 07.01.06 | 07.01.07 | 07.01.09 | 07.01.14 | 07.01.24 | 07.01.25 | 07.01.26 | 07.01.27 | तोंडी गुण | लेखी गुण | एकूण गुण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १ ते ३ | ४ ते १३ | १ ते १३ | |
| निर्धारित गुण | ५ | २ | ३ | ४ | ४ | ४ | ५ | ६ | ५ | ५ | ६ | ४ | ७ | १० | ५० | ६० | |
| एकूण प्राप्त गुण | | | | | | | | | | | | | | | | | |

### तोंडी चाचणी

**प्र. १) खालील उतारा वाच व त्यावर आधारित कोणतेही पाच प्रश्न तयार करून सांग. (गुण ५)**

एके दिवशी अचानक, एक तरुण गावात आला. गावातल्या पारावर बसला. गावातील पारावर बसलेले लोक त्याच्याकडे टकामका पाहू लागले. तो तरुण सपनविक्यासारखाच दिसत होता. तोच चेहरा, तीच अंगकाठी, जणू सपनविक्याच गावात आला होता. आम्ही सगळी मुलं पाराजवळ जमलो. आमच्या गावातल्या सगळ्यांत वृद्ध तात्यांनी त्याला विचारलं, ''कोण रे बाबा तू? कुठून आलास?''

तो म्हणाला, ''मी तुमच्या सपनविक्याचा मुलगा. गुडघेदुखीच्या त्रासामुळे बाबा बऱ्याच वर्षांपासून गावोगावी जाऊ शकत नाहीत; पण खरं सांगू का? गावांत जाणं, तिथल्या लोकांना एकत्र जमवणं, त्यांच्याशी बोलण्यासाठी सुकामेवा विकणं हे केवळ बाबांचं एक निमित्त

होतं. त्यातून त्यांना खूप आनंद मिळत असे. 'आपले अनुभव, आपल्याजवळचं ज्ञान इतरांना सांगावं, दुसऱ्यांना आनंद द्यावा' असं माझ्या वडिलांचं स्वप्न होतं. लोकांची सेवा करण्याचा त्यांचा हा मार्ग मला खूप खूप आवडला.

**प्र. २) खालील शब्दांना तुझ्या बोलीभाषेत इतर कोणते शब्द वापरतात ते सांग.** (गुण २)

१) गवसलं

२) डोईवर

**प्र. ३) इयत्ता सातवीच्या पाठ्यपुस्तकातील तुला आवडणारी कविता तालासुरात व साभिनय सादर कर.** (गुण ३)

---

## लेखी चाचणी

**प्र. ४) खालील उतारा वाच व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ४)

थंडीचा हळवा झंकार सर्वांगाला वेढून टाकणारा. रान, पानाफुलांना आपल्या इशाऱ्यावर नाचवणारा. नदीच्या झुळझुळणाऱ्या पाण्याला मंद लहरींवर खेळवणारा. आकाश स्वच्छ. पुनवेच्या रेखीव छटांनी तर रात्रीचं अंतरंगच उजळून निघालेलं. जिकडे तिकडे लखख झगमगाट पसरलेला. रात्र काहीशी सामसूम; पण मन वेल्हाळ.

रात्र जशीजशी आगेकूच करू लागलेली तशी थंडीची लाटही वाढलेली. सारी थरथरती लाट मफलर, कानटोपी आणि स्वेटरमध्ये बंदिस्त झालेली. अशा कडाडत्या थंडीतही गावगल्लीची वाट सरळ गावाबाहेर घेऊन गेलेली. तिथं चार-सहा जणांचा घोळका शेकोटी पेटवून असलेला. शेकोटीभोवती मक्याच्या कणसांचा भुसा पडलेला. चार-दोन गवऱ्याही त्याच्या बाजूला आपल्या अस्तित्वाची चाहूल देत असलेल्या. शुभ्र चांदण्यांच्या प्रकाशकिरणांत त्यांच्या चाललेल्या भेंड्यांना रंग चढलेला.

अ) वरील उताऱ्यात दिलेल्या वर्णनावरून गटात न बसणाऱ्या शब्दास गोल (○) कर. (गुण १)

थंडी, मफलर, इंद्रधनुष्य, कानटोपी, शेकोटी

आ) उताऱ्याच्या आधारे थंडीची लाट बंदिस्त करणारी कोणतीही एक गोष्ट लिही.

(गुण १)

................................................................................................

................................................................................................

इ) तुझा आवडता ऋतू कोणता? सकारण लिही. (गुण २)

आवडता ऋतू : ................................................................................

ऋतू आवडण्याचे कारण : ....................................................................

................................................................................................

................................................................................................

प्र. ५) खालील चित्र पाहा व चित्राचे वर्णन तुझ्या शब्दांत लिही. (गुण ४)



................................................................................................

................................................................................................

................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

**प्र. ६) खाली दिलेल्या घटनांची तुलना कर व लिही.** **(गुण ४)**

| अ. क्र. | ओला दुष्काळ | कोरडा दुष्काळ |
|---|---|---|
| १. | ..................................................<br>.................................................. | ..................................................<br>.................................................. |
| २. | ..................................................<br>.................................................. | ..................................................<br>.................................................. |

**प्र. ७) तुझ्या शाळेत 'आजी-आजोबा दिन' साजरा करायचा आहे. त्यासंदर्भात खाली काही मुद्दे दिले आहेत ते वाच व त्याबद्दल तुझे विचार लिही.** **(गुण ५)**

**अ)** आजी-आजोबांच्या मनातील भावना. (गुण २)

.....................................................................................................

.....................................................................................................

**आ)** आजी-आजोबांसाठी घेतले जाणारे कार्यक्रम. (गुण २)

.....................................................................................................

.....................................................................................................

**इ)** आजी-आजोबा यांच्याविषयीचे तुझे विचार. (गुण १)

.....................................................................................................

.....................................................................................................

**प्र. ८) कवितेचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** **(गुण ६)**

गोमू माहेरला जाते हो नाखवा।
तिच्या घोवाला कोकण दाखवा।।

दावा कोकणची निळी निळी खाडी
दोन्ही तीराला हिरवी हिरवी झाडी
भगवा अबोली फुलांचा ताटवा ।।१।।

कोकणची माणसं साधी भोळी
काळजात त्यांच्या भरली शहाळी
उंची माडांची जवळून मापवा ।।२।।

सोडून दे रे खोड्या साऱ्या
शिडात शीर रे अवखळ वाऱ्या
झणी धरणीला गलबत टेकवा ।।३।।

**अ)** खालील शब्दांचे तुला माहीत असणारे अर्थ लिही. (गुण २)

१) घोव : ..........................................................................................

२) शीड : ..........................................................................................

**आ)** खालील वाक्यांचा अर्थ सांगणारी कवितेतील ओळ शोधून लिही. (गुण १)

शहाळ्यातील पाणी मधुर व खोबरे गोड असते. त्याचप्रमाणे कोकणातल्या माणसांची मने कोमल व स्वभाव गोड असतो.

..................................................................................................................

**इ)** कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या कोणत्याही दोन जोड्या लिही. (गुण २)

१) ..................................................

२) ..................................................

**ई)** अबोली फुलांच्या ताटव्यासाठी कवितेत आलेले विशेषण लिही. (गुण १)

..................................................................................................................

**प्र. १) सूचनेनुसार उत्तरे लिही.** **(गुण ५)**

> 'मीरे अगं आवर लवकर, त्या वश्याला उटीव. आरं आवरा लवकर, गाड्या निघाल्या.' शंकरच्या आवाजानं तारानं कालवणाला फोडणी दिली. सगळ्यांच्या गाड्या वाटेला लागल्या.

अ) वरील वाक्यांत 'मार्गाने जाणे' या अर्थाचा कोणता वाक्प्रचार आला आहे ते खालील पर्यायातून शोध व लिही. (गुण १)

१) साथ देणे. २) वाटेला लागणे.

३) माघारी फिरणे. ४) नजर लावणे.

....................................................................................................

आ) पुढील वाक्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर कर व वाक्य पुन्हा लिही. (गुण २)

तो बाहेर पडणार तोच राजाला नेमकी जाग आली

....................................................................................................

....................................................................................................

इ) खाली दिलेल्या चौकटीतील म्हण ओळखून लिही व त्या म्हणीचा उपयोग करून एक वाक्य तयार कर. (गुण २)

| | | | |
|---|---|---|---|
| ख | उ | र | ळ |
| फा | पा | ट | ण्या |
| थ | ख | ला | ळा |
| मी | स | ळ | त |

म्हण : ..........................................................

..........................................................

..........................................................

वाक्य : ....................................................................................................

....................................................................................................

**प्र. १०) बस चालकाची मुलाखत घेण्यासाठी खालील मुद्द्यांच्या साहाय्याने पाच प्रश्नांची प्रश्नावली तयार कर.** **(गुण ५)**

(परिचय, कामाचे स्वरूप इत्यादी)

१) ..............................................................................................

२) ..............................................................................................


३) ..............................................................................................

४) ..............................................................................................

५) ..............................................................................................

**प्र. ११) खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द ओळखून शब्दकोडे पूर्ण कर.** **(गुण ६)**

| आडवे शब्द | उभे शब्द |
|---|---|
| २) दिनांक | १) आई |
| ४) आकाश | ३) पक्षी |
| ६) आश्चर्य | ५) डोळे |




**प्र. १२) पूरपरिस्थिती नियंत्रित करणारी दोन कारणे व दोन उपाय लिही.** **(गुण ४)**

कारणे : १) ..............................................................................................

२) ..............................................................................................

उपाय : १) ..............................................................................................

२) ..............................................................................................

**प्र. १३) खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** **(गुण ७)**

अ) दिलेल्या क्रियाविशेषण अव्ययांपासून वाक्य तयार कर. (गुण २)

१) सावकाश : ........................................................................

२) भरपूर : ........................................................................

आ) 'समोर' हे शब्दयोगी अव्यय वापरून अर्थपूर्ण वाक्य तयार कर. (गुण १)

........................................................................

इ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे सरळरूप व सामान्यरूप ओळख व लिही. (गुण २)

| वाक्य | सरळरूप | सामान्यरूप |
|---|---|---|
| मुले <u>मैदानावर</u> खेळत आहेत. | .......................... | .......................... |

ई) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे शब्दयोगी अव्यय ओळख व लिही. (गुण २)

| वाक्य | शब्दयोगी अव्यय |
|---|---|
| <u>टेबलावर</u> पुस्तक आहे. | .............................. |
| काल मी <u>तुमच्याकडून</u> पुस्तक घेऊन आले. | .............................. |

■■■